**कॉलेजच नाव -**

कर्मविर गणपत दादा मोरे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड

**नाव -** शेळार पल्लवी रामदास

**वर्ग** S.Y.BA

**विषय -** पर्यावरण

# अनुक्रमणिका



| विषय | पान क्र. | सही |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | 2 | |
| प्रास्ताविक | 3 | |
| प्रकल्पाचा हेतू / उद्देश | ५ | |
| माहिती संकलन व विश्लेषण | | |
| ① संगमेश्वर मंदिर | ६ | |
| ② हिंगलाज माता मंदिर | १० | |
| ③ नांदुर्डी वरदविनायक मंदिर | १४ | |
| ④ श्री गुरूदेव दत्त मंदिर | १८ | |
| ⑤ श्री खंडेराव महाराज मंदिर | 20 | |
| ⑥ मोठाजाई माता मंदिर | 23 | |
| निष्कर्ष | 2५ | |
| समारोप | 2६ | |

# प्रस्ताविक

निफाड तालुक्यातील धार्मिक स्थळांचा अभ्यास करणे हा दुसरे वर्ष कला पर्यावरण विषयासाठी प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी हा विषय निवडला आहे. हा विषय निवडण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे निफाड तालुक्यातील धार्मिक स्थळांचा असा अभ्यास करून उपाययोजना करणे हा आहे.

निफाड तालुक्यातील धार्मिक स्थळांचा अभ्यास या प्रकल्पासाठी आम्ही वेगवेगळ्या मंदिरांची माहिती गोळा केली व काही माहिती गुगलच्या माध्यमातून लिहली आहे.

निफाड तालुक्यात धार्मिक व पौराणिक संदर्भ असलेल्या ११ गावांचा 'क' वर्ग पर्यटन स्थळात समावेश करण्यात आला. पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत त्यास मान्यता देण्यात आली आहे. निफाड तालुक्यातील करंजगाव येथील सिद्धेश्वर महादेव मंदिर, निफाड मधील संगमेश्वर महादेव मंदिर, खेडेचे हिंगलाज देवीमाता मंदिर, नांदुर्डीचे वरदविनायक गणपती मंदिर, निफाड मधील दत्तमंदिर, निफाडचे ग्रामदैवत श्री खंडेराव महाराज मंदिर, नैताळे मतोबा महाराज मंदिर, भोणजाई माता मंदिर, साकोरे मिगचे, खंडेराव महाराज मंदिर मौजे सुकेणेचे दत्तमंदिर, चाटोरिचे शनि मंदिर



Scanned with CamScanner

कोळुरेचे बाणेश्वर मंदिर, भुसेचे म्हसोबा महाराज मंदिर, पाळखेड्चे खंडेराव महाराज मंदिर आदि मंदिरांचा यात समावेश आहे. या तीर्थस्थळी व यात्रोत्सवास दरवर्षी भाविकांची प्रचंड गर्दी होत असते. मात्र यात्रोत्सवाला होणाऱ्या गर्दीच्या तुलनेत सोयी सुविधा मिळत नाहीत. या गावांना शासनाच्या 'क' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्यात यावा, शासनाच्या माध्यमातून विविध विकास योजना राबविल्या जातात याकरिता संबंधित गावातील ग्रामपंचायतींनी ग्रामसभेत माध्यमातून विविध विकास योजना याबाही ग्रामसभेत ठराव करून त्याबाबत जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव सादर केला होता. त्यास आमदार अनिल कदम यांनी विशेष शिफारस करून सदर गावे 'क' वर्ग पर्यटन स्थळात समाविष्ट करणेबाबत पाठपुरावा केला.

निफाड तालुक्यातील अकरा गावांचा 'क' वर्ग पर्यटन स्थळ म्हणून समावेश करण्यात आला आहे. यामुळे या धार्मिक तीर्थक्षेत्रांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

Scanned with CamScanner

# प्रकल्पाचा उद्देश

निफाड तालुक्यातील धार्मिक स्थळांचा अभ्यास करून हेतु व उद्देश खालील प्रमाणे आहे.

- निफाड तालुक्यातील धार्मिक स्थळांचा अभ्यास करणे.

दरवर्षी कादवा नदीला पूर आल्यामुळे योग्य ती दक्षता घेऊन बांधकाम करावे.


नांदुर्डी वरदविनायक गणपती मंदिरात भाविकांची दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी असते.

उगाव येथील हिंगलाज माता मंदिरात देवीमातेची मुख्य मूर्ती काळी पाषाणाला चिकटून असून जागृत शक्ती आहे. तेथील काचांच्या रंगसंगतीत सुशोभिकरण अत्यंत आकर्षक आहे. निफाड मध्ये दत्त जयंती अत्यंत उत्साहाने साजरी केली जाते.

खंडेराव महाराज यात्रेनिमित्त भाविकांची दरवर्षी प्रचंड गर्दी असते. बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा होतो.

या प्रकल्पात मला मंदिरांची रचना, स्थापना व स्थान विस्ताराची माहिती समजली.

Scanned with CamScanner



श्री संगमेश्वर मंदीर



Scanned with CamScanner

# श्री संगमेश्वर मंदीर

निफाडच्या पश्चिमेला ७० किलोमीटरवर त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग आहे, तर पूर्वेला वेरुळचे घृष्णेश्वर मंदिर आहे. या दोन्ही ज्योतिर्लिंगाच्या मधोमध निफाड हे श्री संगमेश्वर मंदिर आहे. त्यामुळे निफाडचे श्री संगमेश्वर मंदिर हे धार्मिकदृष्ट्या तितकेच महत्त्वाचं आहे. या पुरातन मंदिराची बांधणी हेमाडपंती आहे. हे पुरातन मंदिर आठव्या व तेराव्या शतकात बांधले गेले असे म्हणतात. हे मंदिर काळ्या पाषाणात असून पूर्वाभिमुख आहे. श्री संगमेश्वर मंदिरात नित्यनियमाने पूजा केली जाते. श्री संगमेश्वर भक्त मंडळाचे कार्यकर्ते येथील व्यवस्थापन बघतात श्री संगमेश्वर भक्त मंडळाच्या महाशिवरात्रीला निफाड शहरातून कावडीची मिरवणूक काढण्यात येते गंगेच्या पाण्याने श्री स रुद्राभिषेक केला जातो.


दरवर्षी शिवरात्रीला येथे मोठ्या प्रमाणात धार्मिक विधी सोहळे होतात. त्यानंतर भक्तांना मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचे वाटप केले जाते. संपूर्ण मंदिर आणि मंदिर परिसराला विद्युत रोषणाई केली जाते. शिवाय दर शिवरात्रीला या मंदिरात फार मोठ्या संख्येने भक्त दर्शनाला येतात. श्रावण मासात या ठिकाणी अनेक उपक्रम राबविले जातात. शासनाच्या विशेष निधीतून मंदिर परिसर सुशोभित करण्यात आलेला आहे. येथे सभामंडपाचे काम पूर्ण झाले असून, या ठिकाणी धार्मिक कार्यक्रमासाठी सभामंडप उभारण्यात आले आहे.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner

या मंदिराचे सुशोभिकरण झाल्याने आणि कादवा नदीकाठार काठावर हे मंदिर असल्याने या मंदिराच्या वैभवात आणखी भर पडली आहे. शिवाय मंदिरासमोर विस्तीर्ण अशी जागा असून, या जागेच कॉंक्रिटीकरण झालेल आहे. या जागेच्या कडेने भाविकांकरिता बसायला सिमेंटचे बाकडे आहेत. मंदिराकडे येताना असलेल्या भद्रा मारुती मंदिराचाही जीर्णोद्धार निफाडकरांनी केला आहे. श्री संगमेश्वर मंदिर यामुळे या ठिकाणाला धार्मिक महत्त्व आलेल आहे.

Scanned with CamScanner




हिंगलाज माता मंदीर


देवीच्या आगमनाबाबत आख्यायिका मोठी रंजक

नवसाला पावणाऱ्या हिंगलाज देवीच्या खेडे येथील आगमनाबाबत आख्यायिका मोठी रंजक आहे. मातेचे मूळ पीठ पाकिस्तान व बलुचिस्थान सीमेवरील हिंगला नदीकाठी पहाडावर जागृत आहे. तेथे हिंगलाज मातेच्या दर्शनास लाखो भाविक नियमित येत असतात. डोंगरपुरी नावाचा निस्सीम भक्तही मातेच्या दर्शनास नियमित जात असे. तब्बल ६५ वर्षे देवीची डोंगरपुरी महाराजांनी वारी करून सेवा- उपासना केली. आता आपण थकल्याने हिंगलाज मातेला आपण आपल्या नगरात घेऊन जावे असे मनोमन ठरवत हिंगलाज देवीची उपासना करत मातेस प्रसन्न करून घेतले. हिंगलाज देवीमातेस डोंगरपुरी महाराजांनी गावी येण्याची विनंती केली. हिंगलाज देवीमातेने डोंगरपुरी महाराजांनी भक्ती पाहुन त्यांच्यासोबत गावी जाण्यास तयार झाली. त्यावेळी देवीने डोंगरपुरी महाराजांनी अट घातली कि, मी तुझ्यासोबत येईल, पण जर तुझे ठिकाण येईपर्यंत तु कोठेही मागे वळुन पाहशील तर मी त्याच ठिकाणी थांबेल. हिंगलाज डोंगराज महाराज पुढे व हिंगलाज माता मागे असे पश्चिमेकडून पूर्वेकडे मार्गक्रमण सुरू झाले. क्षेत्र त्र्यंबकेश्वर, नाशिक, पिंपळगाव मार्गे कारस (सध्याचे खेडे हे गांव) गावी आले असता तेथून वाहणाऱ्या चिनता नदीला महापुर आलेला होता. आता पुढे कसे जायचे याबाबत हिंगलाज देवीमातेचा विचार घ्यावा म्हणून डोंगरपुरी



Scanned with CamScanner

महाराजांनी मागे वळून पाहिले आणि हिंगलाज देवीमातेचा दिव्य प्रकाश तेव्हा एकाच जागेवर स्थिर झाला. देवी येथेच थांबणार असेल तर आपणही नगरात कशास जायचे असे म्हणून डोंगरपुरी महाराजांनी विधिवत शास्त्रोक्त पद्धतीने हिंगलाज देवीमातेची प्राणप्रतिष्ठा केली.




नांदुर्डी वरदविनायक (गणपती)
मंदिर

Scanned with CamScanner

# नांदुर्डी वरदविनायक मंदीर

* निफाड :-

वर्षाच्या पहिल्या अंगारिकेच्या योगावर निफाड तालुक्यातील नांदुर्डी येथील येथील वरदविनायक मंदिरात गणेश भक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती, नांदुर्डी येथील येथील वरद-विनायक मंदिरातील सेंदूरमय मूर्तीला पहाटे अभिषेक करण्यात आला.

नांदुर्डी हे निफाड पासून सुमारे ८ कि.मी. अंतरावर आहे. नांदुर्डी गावाचे क्षेत्रफळ सुमारे १०९८.०० हेक्टर आहे. अंगारिकेनिमित्ताने भाविकांची गर्दी लक्षात घेऊन वरदविनायक मंदिर ट्रस्टने मंदिराच्या परिसरात मांडव टाकून सावली केली होती, पाण्याची व्यवस्थाही केली होती. परिसरातील निफाड, निफाड कारखाना, दावचवाडी पिंपळगाव बसवंत, रवळस पिंप्री, कुंभारी, शिवडी यासह दूरवरच्या गावातील भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती मंदिर, परिसरात प्रसादाची व इतर अनेक दुकाने थाटलेली होती, मंदिराचे पुजारी जगदीश कुक कुलकर्णी यांनी धार्मिक पूजा विधी केले मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुरेशबाबा पाटील व विश्वस्तांनी भाविकांच्या दर्शनाची उत्तम व्यवस्था केलेली होती रात्री उशिरापर्यंत भाविकांची मंदिरात दर्शनासाठी गर्दी होती.

मोहोबोर हेंगोडा येथील स्वयंभू सिद्धिविनायक मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी भाविकांनी मल्या

FOR EDUCATIONAL USE
Scanned with CamScanner

पहाटे पासून श्रींच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. अंगारिका चतुर्थी निमित्ताने पहाटे चार वाजता भाविकांकरीता दर्शनासाठी खुले करण्यात आले होते. यावेळी सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टच्यावतीने फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी मंदिर परिसरात पेढे, फुले, खेळणी व फराळाचे दुकाने लावण्यात आल्याने मंदिराला यात्रेचे स्वरुप आले होते तर मंदिरालगत रस्त्यावर दुचाकी व चारचाकी वाहनांची गर्दी झाल्याने वाहतुकीस वारंवार अडथळा निर्माण होत होता.

यावेळी श्रींच्या दर्शनासाठी आबालवृद्धासह महिला भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती रात्री उशिरापर्यंत श्रींच्या दर्शनासाठी लांबच लांबच रांगा लागल्या होत्या.

महाराष्ट्रात गणेशोत्सवाला मोठी परंपरा आहे. सुमारे ५ हजार वर्षांपासून पार्थिव गणपतीची पूजा घरोघरी केली जात असल्याचे संदर्भ आढळतात. थोरले माधवराव पेशवे यांनी घरगुती गणपती उत्सव रुपाने साजरा करण्यास सुरुवात केली. तर लोकमान्य टिळकांनी त्याला सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरूप प्राप्त करुन दिले. महाराष्ट्राला सांस्कृतिक प्राचीन परंपरा लाभलेली आहे. गेल्या अनेक शतकांचा प्राचीन वारसा महाराष्ट्र पुढे घेऊन जात आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक स्थाने ही भौगोलिक, नैसर्गिक, सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक दृष्टीने वेगवेगळी आणि महत्त्वाची आहेत.

महाराष्ट्रात अनेक जागृत, स्वयंभू देवस्थाने आढळतात. गणपती बाप्पा हा आबालवृद्धांपासून भिन्न धर्मीयांपर्यंत सर्वांना आपलासा आणि हवाहवासा वाटतो. त्यामुळेच गणेशोत्सवाला एक वेगळे अनन्य साधारण महत्त्व प्राप्त होते. महाराष्ट्रातील बहुतांश गणेशस्थाने ही स्वयंभू, जागृत असल्याचे सांगितले जाते. महाराष्ट्रातील अष्टविनायक हे जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहेत.

तसेच विदर्भातील अष्टविनायक म्हणून ओळख असणारी गणपती मंदिरेही खूप प्रसिद्ध आहेत. पुणे, कोकण आदी भागातही गणपतीची अनेक मंदिरे आपल्याला आढळून येतात. सर्व मंदिराच्या कथा-कहाण्या, सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक महत्त्व अगदी वेगवेगळे आहे.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner



श्री गुरुदेव दत्त मंदिर



Scanned with CamScanner

# श्री गुरुदेव दत्तमंदीर

निफाड :-

अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ... अशा जयघोषात निफाड येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात गुरु दत्तात्रेयांची जयंती मोठ्या भक्तीभावात व उत्साहात साजरी करण्यात आली. श्री दत्तजयंती निमित्त स्वामी समर्थ सेवा केंद्रात सकाळपासून भाविकांनी दर्शनाला गर्दी केली होती. दुपारी श्री गुरु चरित्र ग्रंथातील दत्त जन्माचा अध्याय वाचून पुष्पांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सामुदायिक महानैवेद्य व आरती विजय गोल्हार यांच्या हस्ते सपत्नीक झाली. त्यानंतर सेवा केंद्राचे प्रमुख वि. दा. व्यवहारे यांनी उपस्थित सेवेकरी भाविकांना श्री समर्थ सेवा मार्ग व दत्तात्रेयाविषयी मार्गदर्शन केले. दत्तजयंती निमित्त सेवा केंद्रात नाम जप यह यज्ञ सप्ताह सुरु आहे.

सप्ताहात सेवेकरी भाविकांना श्री गुरु चरित्र, दुर्गासप्तशती, मल्हारी माहात्म्य या ग्रंथांचे पारायण केले. अनेक सेवेकरी भाविक पारायणाला बसले आहेत. या केंद्रात गुरुवारी (दि. १२) नामजप यज्ञ सप्ताहाची सांगता झाली. त्याबरोबर निफाड येथील पोलीस स्टेशनच्या आवारात असलेल्या दत्तमंदिरात जयंती साजरी करण्यात आली.

या निमित्त भजन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच शिंपी गल्ली येथील पुरातन दत्त मंदिर, माणकेश्वर चौकातील गोसावी वाड्यातही पारंपारिक पद्धतीने दत्तजयंती साजरी करण्यात आली.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner



श्री खंडेराव महाराज मंदिर

Scanned with CamScanner

# खंडेराव महाराज मंदिर

निफाडचे ग्राम दैवत श्री खंडेराव महाराज यात्रेनिमित्त बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा दरवर्षी होत असतो. भाविकांची मोठ्या संख्येने गर्दी होत असते.

निफाड नगरपंचायत आणि श्री खंडेराव महाराज यात्रा कमिटी यांच्यावतीने श्री खंडोबा महाराज यात्रा दरवर्षी प्रमाणे माघपौर्णिमेला उत्साहात साजरी करण्यात आली. 'श्री'ची सकाळी महापूजा झाली. यानंतर कादवाकाठी खंडोबा महाराज पादुकांची पूजा करण्यात आली. त्यानंतर गंगेतून आणलेल्या कावडीची शहरातून सवाद्य मिरवणूक काढण्यात येते. कावडीच्या मिरवणुकीने निफाडकरांचे लक्ष वेधून घेतले होते. खंडेराव मंदिरात 'श्री'च्या कावडीच्या पाण्याने अभिषेक करण्यात आला.

देवाचे मानकरी कचेश्वर दुसाने यांच्या निवासस्थानापासून दुपारी देव मंदिरात आणण्यात आले. त्यानंतर शहरातून देवाच्या रथाची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. यावर्षीचे रथाचे मानकरी महेश जंगम हे होते. त्यांच्या हस्ते रथाचे पूजन झाले. महेश जंगम यांनी सजवलेल्या रथाचे सारथ्य केले. मिरवणुकीच्या अग्रभागी वाद्यवृंद होता.

शिवाजी चौकात आणल्यानंतर हा रथ बारा गाड्यांना जोडण्यात आला. ट्रॅक्टरच्या मागील्या सहाय्याने पिवळा भंडारा उधळण्यात आला. त्यामुळे शिवाजी चौक पिवळा धमक झाला.

श्री खंडेराव मंदिराचे भगत रमेश शेलार यांनी सायंकाळी शिवाजी चौकातून खंडेरावचा जयघोष करीत बारा गाड्या ओढल्या. यावेळी हजारो भाविकांनी खंडेराव महाराजकी जय अशा जयजयकार करीत परिसर दणाणून सोडला.

याप्रसंगी श्री खंडेराव महाराज यात्रा कमिटीचे सर्व पदाधिकारी, निफाड नगरपंचायतीचे नगरसेवक उपस्थित होते. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. श्री खंडेराव महाराज मंदिर येथे मंगळवारी रात्री जागरण गोंधळण कार्यक्रम झाला. पहाटे लंगर तोडून उत्सवाची सांगता झाली.

Scanned with CamScanner




लोणजाई माता मंदिर

# लोणजाई माता मंदिर

नाशिक-औरंगाबाद महामार्गावर विंचुर ते नैताळे दरम्यान डोंगरावर असलेले लोणजाई मातेचे भव्य मंदिर आपले लक्ष वेधून घेते. 300 वर्षांपूर्वीच्या असलेल्या या मंदिर परिसराचा समावेश आता शासनाच्या 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रात करण्यात आला आहे. या मंदिरासह परिसराला शासकीय निधीतून विविध कामे करून सजविण्यात येणार आहे. यामुळे या लोणजाई गडावर धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार आहे.

लोणजाई देवी मंदिरास ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत 'ब' वर्ग दर्जा प्राप्त झाला आहे. यामुळे मंदिर परिसर विकासकामी कोट्यवधींचा निधी मिळण्यासह विकासकामांना चालना मिळणार आहे. निफाड तालुक्यातील लोणजाई डोंगर विंचूर नजीक नाशिक-औरंगाबाद महामार्गापासून पाच ते सहा किमी अंतरावर सुभाषनगर गावाजवळ आहे. नवरात्रोत्सवात येथे मोठ्या प्रमाणात भाविकांची मांदियाळी असते. समुद्र सपाटीपासून अतिशय उंचावर असलेला लोणजाई डोंगर हिरवाईने नटलेला असल्याने येथे पर्यटनासाठी तालुक्यातील नागरिकांची कायम वर्दळ असते. श्रीमंत बाजीराव पेशव्यांचे सरदार विठ्ठल शिवदेव विंचूर

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner

कर यांनी अतिशय सुंदर असे मंदिर ३०० वर्षा-पूर्वी बांधले आहे तीर्थक्षेत्र डोंगरावर असल्याने कायम हिरवेगार व थंड वातावरणामुळे पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. येथील माजी सरपंच मधु-कर देस्कर यांच्यासह स्थानिकांनी लोकसहभागातून. वै. माना महाराज भक्त परिवार, छोट्याशा मंदिरास भव्य स्वरूप देऊन मंदिराचा जिर्णोद्धार केला आहे. तसेच श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या सेवेकरी वर्गाने येथे मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून त्यांची जोपासना केली आहे. त्यामुळे अलीकड-च्या काळात हे ठिकाण आल्हादक बहरले आहे.



Scanned with CamScanner

# निष्कर्ष

आम्ही निफाड तालुक्यातील धार्मिक स्थळांचा अभ्यास या प्रकल्पाच्या पूर्तीसाठी काही मोजके मुद्दे घेतले ज्याच्या आधारे आम्ही हा प्रकल्प पूर्ण केला. या प्रकल्पाच्या पूर्तीसाठी आम्ही काही धार्मिक स्थळांची माहिती मिळविण्यासाठी मंदिरांना भेटी दिल्या. ज्यामुळे आम्हाला त्यांचे मनोगत जाणून घेणे आणि त्यांच्या समावेश करण्याची संधी मिळाली. या प्रकल्पामुळे मला आसपासच्या भागातील धार्मिक स्थळांबद्दल माहिती मिळण्यास मदत मिळाली. ज्याच्या आधारे या प्रकल्पाची पूर्ती झाली.

Scanned with CamScanner

# समारोप

निफाड तालुक्यातील धार्मिक स्थळांचा अभ्यास या प्रकल्पासाठी आम्ही वेगवेगळ्या धार्मिक स्थळांबद्दल तेथील मंदिराबद्दल शेजारील खेडे आणि तेथील पर्यावरणाच्या आधारे या प्रकल्पास सुरुवात केली. हा एक पर्यावरणीय अभ्यास या प्रकल्पाविषयी या प्रकल्पात अभ्यास केला. कर्मवीर गणपत दादा मोरे, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय या महाविद्यालयाने मला प्रकल्प करण्यास संधी दिली. त्या बद्दल त्यांचे आभार व ज्या मार्गदर्शक शिक्षिका म्हणजेच निकम मॅडम यांचे पण आभार. परिसरातील लोकांनी मला धार्मिक स्थळांबद्दल माहिती सांगितली त्यांचे ही आभार अशा प्रकारे सर्वांचे आभार, मनपूर्वक आभार .....

Scanned with CamScanner